# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १९ मार्च, २०१३.

## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत)

**म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

**सर्वश्री विनोद तावडे,** दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड. अनिल परब, सर्वश्री आशिष शेलार, विनायक राऊत, राजेंद्र जैन **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतील -

"भंडारा जिल्ह्यातील लाखनी ता.मूरमाडी येथील अनुक्रमे ११, ९ व ६ वर्षे वयाच्या ३ अल्पवयीन मुलींचे अपहरण व बलात्कार होऊन हत्या होणे, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ ला अपहरण झालेल्या या मुलींचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी महामार्गावरील ढाब्याजवळच्या विहीरीत प्रेत आढळणे, अद्यापही पोलीसांना गुन्हेगार पकडण्यात आलेले अपयश, राज्यात अनेक ठिकाणी महिलांवर होत असलेले अत्याचार, विशेषतः धुळे, भंडारा, पुणे, मुंबई, अकोला, शिर्डी-अहमदनगर, रायगड, ठाणे, सातारा, नागपूर, या जिल्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलींवरील बलात्कार, कुंटणखान्यात जबरदस्तीने देह विक्रय करावयास लावणे, फूस लावून लग्नाचे अमिष दाखवून फसवणूक करणे, अश्लील चित्रफीत करुन ब्लॅकमेल करणे, इत्यादी मार्गाने जानेवारी, २०१३ पासून अद्यापपर्यंत होत असलेल्या अत्याचाराच्या वाढत्या घटना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

## (सकाळी ११.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : " राज्यातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांच्या मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ " या विषयावरील श्री.छगन भुजबळ, श्री.वसंत चव्हाण, श्री.बबनराव ढाकणे, श्रीमती विद्या

बेलोसे, श्रीमती रजनी सातव, श्री.व्यंकाप्पा पतकी, श्री.अरुण मेहता, श्री.अजहर हुसैन, श्री.कृपाशंकर सिंह, श्री.अनिल पटेल, श्रीमती वसुधा देशमुख, श्री.रविंद्र मिर्लेकर, श्री.अरविंद सावंत, श्रीमती निला देसाई, श्री.जयप्रकाश बाविस्कर, श्रीमती उमेशा पवार, श्री.बाळासाहेब साळुंखे, श्री.नितीन शिंदे, श्री.किसनराव राठोड, श्री.मधुकर किंमतकर, श्री.किशोर काशिकर, श्री.अशोक चव्हाण, श्री.शरद वाणी, श्री.विजय पाटील, श्री.दिवाकर पांडे, श्री.शाळीग्राम बसैये, श्री.पांडुरंग हजारे, श्रीमती इंदूमती नाकाडे, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २१०९० ला दिनांक १९/१२/१९९७ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **पर्यावरण मंत्री** : " नवी मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत " या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २४७३७ ला दिनांक १३/४/२००७ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे-**

**उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : " महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०१२-२०१३" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **डॉ. दिपक सावंत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईतील बॉम्बे (मुंबई) नर्सिंग होम्स ॲक्ट खाली नोंदणीकृत झालेली अनेक नर्सिंग होम्स (फायर एन.ओ.सी.)अग्नीशमन दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांचे मुंबई शहर व उपनगरातील लायसेन्स (परवाना) नुतणीकरण होत नाही, नर्सिंग होम्स परवाना पुनर्जिवित न झाल्याने मेडिकल इन्शुरन्सचा फायदा सामान्य रुग्णांना मिळत नसणे, त्यामुळे सर्वसामान्यांना भूर्दंड पडत असणे, मुंबईत काही नर्सिंग होम्स डे-केअर सेंटर्स असून, काही सन १९९५ च्या पूर्वीची नर्सिंग होम्स असणे, त्यामुळे नर्सिंग होम्ससाठी आवश्यक वेगळा प्रवेशही उपलब्ध नसणे, त्यामुळे डॉक्टर्स, नर्सिंग होम्स चालक व मेडिकल इन्शुरन्स मिळणारे रुग्ण यांच्यात प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका. "

(२) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतीश चव्हाण, धनंजय मुंडे **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" बीड जिल्ह्यात विशेषत: गेवराई तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात रानडुक्कर व हरिणासारख्या प्राण्यांनी घातलेला हैदोस, दुष्काळ व पाणी टंचाई यामुळे अतिशय काटकसरीने जोपासलेली ऊस, कापूस आदींसारखी नगदी पिके रानडुक्करांच्या प्रादुर्भावामुळे नष्ट होणे, यामुळे शेतकऱ्यांचे झालेले कोट्यावधी रुपयांचे आर्थिक नुकसान हवालदिल झालेला शेतकरी, शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे वन व महसूल विभागाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, नुकसान भरपाईसाठी शासनाने केलेली जाचक प्रणाली, संरक्षीत प्रजातीमुळे रानडुक्कर व हरिणांचा बिमोड करण्यास शासकीय स्तरावरुन येत असलेल्या अडचणी, यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया. "

(३) **डॉ. रणजित पाटील,** सर्वश्री. नागो गाणार, दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, विक्रम काळे, अनिल भोसले, सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यातील १ हजार ३९ गोदामांपैकी १८४ गोदामे निकृष्ट दर्जाची आढळून येणे, ७५ लाख मेट्रींक टन धान्याच्या साठवणुकीचा प्रश्न राज्याच्या अन्न पुरवठा विभागासमोर निर्माण होणे, लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या धान्याच्या साठवणीबाबत राज्य शासन फारसे

गंभीर नसणे, परिणामी साठवलेले धान्य दरवर्षी खाण्याच्या स्थितीत राहत नसल्याचे आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट होणे, कुजलेल्या अवस्थेमधील हे धान्य शिधापत्रिका धारकांना वितरीत केले जाणे, त्याच बरोबर राज्यात ५ कोटी ६८ लाख मेट्रीक टन धान्य साठवण्यासाठी पुरेशी गोदामेच नसल्याने भाड्यापोटी वर्षाकाठी २८० कोटी ६८ लाख रुपयाचा महसुल खर्च व्यर्थ जाणे, तसेच पावसाळ्यात गोदामाच्या गळतीमुळे धान्याची नासाडी होणे, प्रतिकुल परिस्थितीत टिकून राहण्यासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च केले जात असणे, निकृष्ट गोदामाचा यादीमध्ये राज्यातील २१ जिल्हे असुन विदर्भातील गोदाम संख्या सर्वाधिक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(४) **दिप्ती चवधरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" पुणे येथील खडकवासला कालव्याची कोट्यावधी रुपये किंमतीची जागा खासगी विकासकाला देऊन या महसुलामधून ७०० कोटी रुपये किंमतीचा खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानचा भुयारी कालवा बांधण्याच्या कामास राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतरही अद्याप प्रत्यक्षात कामात अजिबात सुरुवात न होणे, त्यामुळे दरवर्षी ५ टीएमसी पाणी वाया जाणे, खडवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या २४ किलोमीटरच्या पट्टयात हा भुयारी कालवा काढण्याचा प्रस्ताव असणे, पुणे शहराला वाढत्या मागणीनुसार पाणी पुरवठा करु शकेल असे धरण बांधण्यासाठीची जागा उपलब्ध नसल्याने पाण्याची गळती, चोरी आणि बाष्पीभवन रोखण्यासाठी भुयारी कालवा हा उत्तम पर्याय ठरेल असे या प्रस्तावात नमूद असणे, खडकवासला धरणाच्या मुखाशी हा भुयारी कालवा सुरु होऊन धायरी, कात्रजमार्गे डोंगरातून फुरसुंगीपर्यंत नेण्याच्या या प्रस्तावित कालव्यासाठी जमीन संपादन व सर्वेक्षण होऊन शासनाने संबंधित प्रस्तावाला मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

सहा : **विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

सात : **(सोमवार, दिनांक १८ मार्च, २०१३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर )**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.रामनाथ मोते,

सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.नागो गाणार, भगवान साळुंखे, कपिल पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामावर बहिष्कार टाकला असणे, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ५ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची ८० टक्के थकबाकी न देणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता न देणे, शिक्षकेत्तरांच्या आकृतीबंधाचा विषय गेली १३ वर्षे प्रलंबित असणे, कायम विना अनुदानित शाळांचा शब्द काढून टाकताना उच्च माध्यमिक शाळांना जाणीवपूर्वक वगळणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या मुल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्याचे मान्य करुनही कारवाई न होणे, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या विना अनुदानित सेवा कालावधी वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सर्व शिक्षकेत्तरांना वगळणे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देय वेतनवाढी ४ वर्षापासून बंद करणे, शिक्षकेत्तरांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करणे, वेतनेत्तर अनुदानाची मागील ८ वर्षांची थकबाकी नाकारणे, पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना संरक्षण व समायोजन नाकारणे, गुणवत्तेच्या नावाखाली सेवेत असलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी पदवी प्राप्त करण्याची सक्ती करणे, विना अनुदानित शाळांचे मुल्यांकनाचे जाचक निकष शिथील करण्याचे आश्वासन देऊनही शासनाने कारवाई न करणे, विना अनुदानित शाळेत सेवेत असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण न देणे, परिणामी विना अनुदानित शाळेच्या शिक्षकांनी आत्मदहनाचा इशारा देणे, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार जाहीर केल्यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये शासनाविषयी नाराजी निर्माण होणे, विद्यार्थी हिताचा विचार न करता शासनाने या विषयाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व पालक यांचेवर प्रचंड ताण व तणाव निर्माण होणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या व विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या उक्त मागण्यांच्याबाबतीत तोडगा काढण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी. "

## मध्यंतर

**आठ : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-

**१) वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री**

**२) ग्रामविकास मंत्री**

**३) महसूल व खार जमीन मंत्री**

**४) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्री**

**५) जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री**

**६) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री**

**७) शालेय शिक्षण मंत्री**

**८) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री**

**९) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री**

**१०) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री**

**११) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

**१२) महिला व बालविकास मंत्री**

**१३) पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री**

**नऊ : शासकीय विधेयक :-**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**दहा : म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**श्रीमती अलका देसाई,** श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. सुभाष चव्हाण, हेमंत टकले, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरजंन डावखरे, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा.सुरेश नवले, श्री.संजय दत्त, दिप्ती चवधरी **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" भारतीय घटनेनुसार प्रत्येक महिला शासन, समाज, जात व कुटूंब या सर्व पातळीवर समान हक्कासाठी पात्र असूनही पाहिजे तसा फायदा महिलांना मिळत नसणे, पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात आज महिला काम करताना दिसत आहेत. कोणत्याही क्षेत्रात विशेष करुन शैक्षणिक क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे आढळून येणे, मात्र, स्त्री-भ्रूण हत्येने मुलींचे घटते प्रमाण हा एक फार चिंतेचा विषय असणे, तसेच महिलांवर

होणाऱ्या अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, समाजाकडून व कुटूंबाकडून महिलांना चांगली वागणूक व समानतेचा दर्जा मिळत नसणे, महिलांच्या संरक्षणार्थ व महिलांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी पोलीस विभागाची उदासिनता असणे, केंद्र शासनाने महिला अत्याचाराविरोधी लोकसभेत आणलेले विधेयक ही एक दूरगामी परिणाम करणारी घटना आहे, न्यायालयात महिला अत्याचाराविरोधी सर्व खटले फास्ट ट्रॅक वर घेऊन त्वरीत निकाल मिळणे अत्यंत आवश्यक असणे, महिला वर्गामध्ये सुध्दा विधवा, परितक्त्या व पिडीत वर्गातील महिलांकडे तसेच मोलमजुरी करणाऱ्या महिलांकडे विशेष लक्ष देऊन करावयाच्या उपाययोजना, यासाठी महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी व स्त्री हक्कांची अंमलबजावणी अधिक चांगल्याप्रकारे करण्यासाठी आणि महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.**

" नाशिक जिल्ह्यातील देवस्थानाच्या नावे असलेल्या जमिनींना अकृषिक परवानगी देताना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याबाबत " या विषयावरील श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३५०१७ ला दिनांक १४/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

" बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत " या विषयावरील श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४१६२ ला दिनांक २१/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १८ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.